


# भारताचे स्वराज्य आणि राष्ट्रवाद !

**इंग्रजीचे व इंग्रजी राज्याचे पोवाडे window on the world या शब्दांनी आजकाल गायिले जातात. यात एक मूलभूत गोष्ट विसरली जाते. खिडक्यासाठी भिंती आवश्यक असतात. भिंतीच नसतील तर खिडक्याच काय घरही बनू शकणार नाही. त्याचप्रमाणे ज्याला स्वत:ची अक्कल आहे तोच दुसऱ्याच्या अकलेचा उपयोग करू शकतो. परभाषेचा फायदा करून घेण्यासाठी जे स्वभाषेचाच गळा घोटू इच्छितात व विदेशीय संबंधांचा फायदा मिळविण्यासाठी जे स्वराज्यावरच कुऱ्हाड चालवितात ते घरावाचून खिडक्या बनवू इच्छित असतात.**

**डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटनने भारतावरील आपली सत्ता काढून घेतली व भारत आपली वाट चोखाळण्यास स्वतंत्र झाला. भारताने आपले संविधान बनविले व जवाहरलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान झाले.

संविधानाचा पहिलाच ठराव असा होता की भारत हे स्वतंत्र व सार्वभौम प्रजासत्ताक राहील. प्रजासत्ताक या शब्दाचा अर्थ असा होतो की या देशातील सत्ता सर्व भारतीय जनतेची राहील, कोणत्याही एका व्यक्तीच्या हाती राहणार नाही. सार्वभौम शब्दाचा अर्थ असा आहे की देशासंबधीचे अंतिम निर्णय भारतीय जनतेच्या समंतीने त्यांचे प्रतिनिधित्व न करणाऱ्या कोणत्याही संस्थेच्या हाती राहणार नाहीत. स्वतंत्र शब्दाचा अर्थ असा होतो की भारत हा देश राजकीय दृष्टीने भारताच्या बाहेरील अन्य कोणत्याही देशाचा वा देशसमूहाचा भाग म्हणून वा कोणत्याही भारताबाहेरील व्यक्तीच्या अंमलाखाली राहणार नाही.

पण संविधान अमलात येण्याच्या आधीच नेहरूनी एक ठराव मांडून हे कलम संविधान समितीकडून दुरुस्त करविले. या दुरुस्तीनुसार पहिल्या कलमातील स्वतंत्र हा शब्द गाळण्यात आला. स्वतंत्र शब्द गाळल्यामुळे भारत हा ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश झाला.

आता प्रश्न असा उद्‌भवतो की भारत हा जर ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश आहे व ब्रिटिश सिंहासन हे जर या साम्राज्याचे अंतिम शक्तिस्थान आहे तर भारत हा देश स्वतंत्र आहे असे म्हणण्यात काय अर्थ उरला?

याचे उत्तर आमचे संविधान असे देते की ब्रिटिश सिंहासन हे भारतीय प्रजात्ताकाच्या सत्तेचे ध्वजासारखे प्रतीक आहे. आम्ही ध्वजाला आमच्या देशाचे प्रतीक म्हणून वंदन करतो. पण आमच्या देशासंबंधीचे कोणतेही निर्णय हा ध्वज घेत नाही. त्याचप्रमाणे आमच्या देशासंबंधीचे कोणतेही निर्णय ब्रिटिश सिंहासन घेणार नाही.

सचिवालयावर अनेक ठिकाणी असलेल्या ब्रिटिश राजमुकुटाच्या प्रतिकृती काढण्यात आल्या. याचे कारण 'प्रजासत्ताकात राजमुकुट व राजसिंहासन यांना स्थान नसते.' असे देण्यात आले. पण ज्याला आमच्या सार्वभौमतेचे आम्ही प्रतीक मानतो ते आमच्या सचिवालयावरून काढून टाकणे आमच्या संविधानाविरुध्द नाही काय?

ब्रिटिश सिंहासन किंवा ब्रिटिश राजमुकुट हे जर आमच्या देशाचे प्रतीक आहे तर त्याला आमच्या ध्वजात स्थान असायला पाहिजे. पण ते स्थान मुळीच नाही.

ब्रिटिश राजमुकुटाबद्दल ज्याप्रमाणे संवैधानिक संदिग्धता आहे त्याचप्रमाणे ब्रिटिश साम्राज्याचा ध्वज जो युनियन जॅक त्याबद्दलही आहे. ब्रिटिश साम्राज्यातील इतर देशांच्या ध्वजात ब्रिटिश साम्राज्याचा ध्वज यूनियन जॅक हा कोपऱ्यात दाखविलेला असतो. पण आपल्या ध्वजात तो दाखविलेला नाही.

पं नेहरूच्या ही गोष्ट लक्षात आली. त्यांनी एकदा लोकसभेवर युनियन जॅक फडकविला होता. व त्याच्या समर्थनार्थ भाषणही दिले होते. पण त्या भाषणात देखील 'मी सचिवालयावर युनियन जॅक फडकवायला सांगितले होते पण तो चुकीने लोकसभेवर फडकविण्यात आला.' असे स्पष्टीकरण दिले.

या स्पष्टीकरणाचा अर्थ काय समजायचा? राजकीय निर्णय

लोकसभेतच होत असतात. सचिवालय हे त्या निर्णयांची अमलबजावणी करण्याचे स्थान आहे. ब्रिटिश साम्राज्य हे आमच्यासाठी राजकीय निर्णय घेणार नाही पण आमच्या लोकसभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करील हे म्हणणे हास्यास्पद आहे.

दुसरे असे की एखाद्या ध्वजाला प्रतीक मानता येते तसे ब्रिटिश सिंहासनाला प्रतीक मानता येणार नाही. कारण प्रतीक होण्यापूर्वी ध्वजाचे अस्तित्व फक्त एका कापडाच्या रूपाने असते.

**ब्रिटनचे अलिखित संविधान**

पण ब्रिटिश सिंहासन आमचे प्रतीक होण्यापूर्वीही एक संस्था म्हणून अस्तित्वात होती व आम्ही ते प्रतीक न मानल्याने तिचे अस्तित्व नाहीसे होत नाही, त्यामुळे ब्रिटिश सिंहासनाला प्रतीक मानणे हे एखाद्या स्त्रीने एखाद्या जिवंत पुरुषाच्या प्रतिमेला आपल्या सौभाग्याचे प्रतीक मानावे पण त्या पुरुषाला आपल्याशी संबंध ठेवण्याचा अधिकारच नाही असे ठासून सांगावे अशातला प्रकार झाला. तात्पर्य अस्तित्वात असलेल्या सिंहासनापासून स्वतंत्र पण सिंहासनाला प्रतीक मानणारे राज्य ही एक अर्थशून्य शब्दयोजना आहे.

स्वतंत्र पण ब्रिटिश साम्राज्यांतर्गत या शब्दयोजनेच्या अर्थशून्यतेबद्दल काथ्याकूट न केला तरी स्वतंत्र शब्द काढण्यातला हेतू भारत हे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत राष्ट्र आहे हे सांगण्याचा आहे हे स्पष्ट आहे. स्वतंत्र प्रजासत्ताक या शब्दयोजनेतील स्वतंत्र हा शब्द काढताना नेहरूनी 'ब्रिटिश साम्राज्यातून फुटून निघालो तर आपण एकाकी पडू.' असे कारण सांगितले होते. हिंतवादाचे संपादक श्री. कोदंडराव स्पष्टपणे म्हणत की आपले कोणा राष्ट्राशी संबंध बिघडले तर आपल्याला ब्रिटिश साम्राज्यात राहण्याने काय फायदा होतो हे कळेल. पुढे लवकरच चीनशी संबंध बिघडले तेव्हा ब्रिटिश साम्राज्याचा आपल्याला काहीच उपयोग झाला नाही. आपल्या रक्षणास धावला तो इंग्रज असूनही ब्रिटिश साम्राज्यातून पूर्णपणे फुटून निघालेला अमेरिका.

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत असणे म्हणजे काय याचा विचार केला असता ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश मधून मधून एक सभा घेतात. त्यात काही राजकीय प्रश्नांचा खल होतो व या संमेलनाचे अध्यक्षपद ब्रिटिश सिंहासनाकडे असते. याव्यतिरिक्त काही सांगता येत नाही. ब्रिटनशी व्यापार करण्यास साम्राज्यांतर्गत देशांना काही सवलती असतात असे सांगण्यात येते. भारताला ब्रिटनशी व्यापार करण्यात साम्राज्यात राहिल्यामुळे ज्या तहाने मिळू शकणार नाहीत अशा कोणत्या सवलती मिळाल्या याची मी चौकशी केली पण कोठेही स्पष्ट उत्तर मिळाले नाही.

आपण प्रजासत्ताक म्हणवितो म्हणून ब्रिटिश सिंहासनाला आमच्या देशात स्थान नाही असे म्हटले तरी जे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश प्रजासत्ताक म्हणवीत नाहीत त्यांच्यात ब्रिटिश सिंहासनाचे स्थान काय हा प्रश्न उद्‌भवतो. या देशांचा सत्ताधीश गव्हर्नर वा गव्हर्नर जनरल म्हणवितो व त्याची नियुक्ती ब्रिटिश सिंहासन करते. जो नियुक्ति करतो त्याला बडतर्फी करण्याचाही अधिकार असतो या अर्थी हे देश स्वतंत्र म्हणता येत नाहीत. पण एकदा नियुक्ती केल्यावर या गव्हर्नरांचे निर्णय मंजुरीसाठी ब्रिटिश सिंहासनाकडे जात नाहीत व या देशातील राज्य कसे चालावे हे ब्रिटिश सिंहासन ठरवीत नाही. एवढेच नव्हे तर फिजी या ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशात क्रांती होऊन राणीने नेमलेल्या गव्हर्नर जनरलला पदच्युत करण्यात आले तेव्हा राणीने या क्रांतिकारकांना शासन करावे अशी मागणी आली असताना राणीने तसे करण्याचे नाकारले.

पण हे लक्षात ठेवले पाहिजे की यापैकी कोणत्याही गोष्टीला कोणत्याही लेखी संविधानाचा आधार नाही. कारण ब्रिटनला लेखी संविधानच नाही. ब्रिटिश सिंहासनाचे ब्रिटनवरील अधिकार देखील कोणत्याही लिखित कायद्याने नियंत्रित केलेले नाहीत. ते केवळ परंपरेने ठरलेले आहेत.

प्रजासत्ताक नसलेल्या देशावर ब्रिटनचे अधिकार काय आहेत हेच जर लिखित कायद्याने ठरलेले नाही तर राजसत्ता न मानणाऱ्या व तरीही ब्रिटिश साम्राज्यात असलेल्या भारतासारख्या देशावर ब्रिटनचे अधिकार काय याबद्दल लेखी कायदा कोणताच नाही हे सांगण्याची जरूर नाही. भारतावरील ब्रिटनच्या अधिकाराबद्दल परंपरेचाही आधार घेता येत नाही. कारण भारताने ही भूमिका

घेण्यापूर्वी ब्रिटनशी असे नाते ठेवणारा कोणताच देश नव्हता. याबद्दल जी काही परंपरा असेल ती गेल्या ५८ वर्षांतली. म्हणजे भारतावर ब्रिटनचे अधिकार काय हे ब्रिटिशांच्या गेल्या ५८ वर्षांच्या परंपरेवरून ठरते. पण आपल्या परंपरा बदलायच्या नाहीत अशी ब्रिटिशांची परंपरा नाही. आक्स्फर्ड विद्यापीठामध्ये मुलींना प्रवेश द्यायचा नाही असा नियम आहे. तो अजूनही रद्द करण्यात आलेला नाही. पण तरी तेथे मुलींना सर्रास प्रवेश मिळतो. याबाबतीत कायदा न बदलताच ब्रिटिशांनी आपली परंपरा बदललेली आहे. तसेच उद्या भारताबद्दल ब्रिटनने आपली परंपरा बदलली तर त्यावर ब्रिटिश जनतेखेरीज कोणी आक्षेप घेऊ शकत नाही.

**भारत हे कडबोळे नाही**

ब्रिटन आपली परंपरा बदलेल असा काहीच संभव नाही. तेव्हा हा कायद्याचा व्यर्थ काथ्याकूट आहे असे वाचकांना वाटेल. पण हा काथ्याकूट ब्रिटनच्या दृष्टीने व्यर्थ असला तरी भारताच्या दृष्टीने व्यर्थ नाही. मीरा कृष्णाला आपला पती मानत होती हे ५००० वर्षांपूर्वी झालेल्या कृष्णाच्या दृष्टीने अर्थशून्य असले तरी मीरेच्या दृष्टीने अर्थशून्य नव्हते. तिचे सारे जीवनच या श्रध्देवर आधारलेले होते. तसे आजच्या भारताचे सारे जीवन आपल्यावर अजून इंग्रजांचेच राज्य आहे व खऱ्या इंग्रजांचे ते नसले तरी आपल्याला भारतावरील शेवटच्या इंग्रज राज्यकर्ता म्हणविणाऱ्या नेहरूंचे व त्यांच्या वैचारिक वंशजांचे राज्य सुरू आहे. आपणही इंग्रज होण्याचा प्रयत्न केला पाहिजे या विचाराने प्रेरित झालेले आहे.

'स्वातंत्र्याच्या सुरूवातीपासूनच नेहरूंनी आपले नवीन तत्त्वज्ञान सांगायला सुरूवात केली होती. त्यांच्या भाषणांचे व कृत्यांचे सार पुढीलप्रमाणे आहे.

१) भारत हे राष्ट्र नाही. निरनिराळ्या वेळी बाहेरून आलेल्या लोकांचे ते एक कडबोळे आहे. हजारो वर्षांत देखील त्याच्यात कोणतेही एकत्वाचे सूत्र निर्माण झाले नाही.

२) या सर्व बाहेरून आलेल्या लोकांपैकी जे पूर्वी आले त्यांनी नंतर आलेल्यांना परकीय समजणे बरोबर नाही. आर्य बाहेरून आले असल्यामुळे त्यांचा वारसा सांगणारे हिंदू हे देखील परकीयच आहेत. त्यांनी नंतर आलेल्या मुघलांना व इंग्रजांना परकीय समजणे अन्यायाचे आहे.

३) इंग्रज सगळ्यांत शेवटी आले व ते सर्वांत प्रगत व सुसंस्कृत होते. म्हणून त्यांच्यामुळे देशात निर्माण झालेले विशेष आपण आदराने जोपासले पाहिजेत. या विशेषांपैकी इंग्रजी भाषा हा सर्वात महत्त्वाचा विशेष आहे.

नेहरू केवळ भाषणे करूनच थांबले नाहीत. त्यांनी हिंदीही केंद्र सरकारची भाषा असावी हे संविधानाचे कलम साफ गुंडाळून ठेवले व इतर भारतीय भाषा प्रांतीय स्तरावर देखील वापरल्या जाऊ नयेत म्हणून भाषावार प्रांतरचनेला विरोध केला. हा विरोध प्रांताच्या सीमा आखण्याच्या बाबतीत सफल झाला नाही तरी देशी भाषांना शिक्षण व शासन यापासून दूर ठेवण्याच्या बाबतीत बराच सफल झाला. जे करण्याचे इंग्रजांच्या कधी मनातही आले नाही ते शाळेच्या पहिल्या वर्गापासून इंग्रजी व इंग्रजी माध्यम फार मोठ्या प्रमाणात नेहरू व त्यांचे राजकीय वारसदार यांनी अमलात आणले आहे.

आर्य नावाचे कोणी लोक प्राचीन काळी भारतावर स्वारी करून येथे आले व संस्कृत ही त्यांची भाषा आहे या मताचे हल्ली सप्रमाण खंडन झालेले आहे. Lexicon या २१ खंडाच्या अमेरिकन विश्वकोशात 'भारतावर आर्य लोकांचे आक्रमण झाले ही बेछूट भाषाशास्त्राची कल्पना आहे, आर्य हे काल्पनिक लोक आहेत व वैदिक संस्कृतीचे मूळ उत्तर भारतातच आहे.' असे स्पष्ट म्हटले आहे. विल ड्यूरंट या विख्यात इतिहासकाराने म्हटलेआहे की भारत हीच आमच्या बहुवंश भाषांची जननी आहे. (Case for India) म्हणजे युरोपातून आर्य नावाचे कोणी लोक भारतावर आक्रमण करून आले नसून भारतातूनच संस्कृतभाषी लोक युरोपात गेल्यामुळे संस्कृतातून युरोपीय भाषा उद्भवल्या. या मताचेच साधार प्रतिपादन माझ्या 'कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या' या मराठी व The Mythical Aryans and their Invasion या इंग्रजी ग्रंथात केले आहे.

आर्यांचे भारतावर आक्रमण हे एक मिथ्य असले तरी भारतीयाच्या राष्ट्रीयत्वाबद्दल विचार करताना हे मत सर्वमान्य होण्याची वाट पाहण्याची जरूर नाही. आर्यांच्या आक्रमणाचे प्रतिपादन करण्यासाठी पुष्कळ आडवळणाची किचकट व अनावश्यक अनुमाने काढावी लागतात. हिंदूंच्या प्रत्यक्ष जीवनात अशा आक्रमणाचा काही मागमूस दिसत नाही व आज भारतात आर्य व अनार्य असे दोन समूह नाहीत. तेव्हा आज भारतात असलेले हिंदू हे बाहेरून आलेले आहेत असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही. तसेच जे निश्चितपणेच बाहेरून आले ते शक, हूण, ग्रीक वगैरे आज भारतात दिसत नाहीत. ते हिंदू समाजसागरातच विलीन झालेले आहेत.

**स्वत्वहीनतेचे इंग्रजी समर्थन**

शिवाय ग्रीक, शक व हूण भारतात आले हे म्हणणेही दिशाभूल करणारे आहे. ग्रीक, शक व हूण जनसमूहांनी भारतात देशांतर केले नाही. त्यांचे लोंढेच्या लोंढे येथे वसाहत करण्यास कधीच आले नाहीत. ग्रीक, शक व हूण राजे आपले सैन्य घेऊन येथे आले.

येथे राज्य स्थापन करण्यात सगळ्यात जास्त सफलता शकांना मिळाली. पण तेही येथे वसल्यावर येथल्या संस्कृतीत पूर्णपणे मिसळून गेले. ग्रीक व हूण यांचा निर्णायक पराभव झाला व उरलेले जे येथे स्थायिक झाले असतील तेही शकाप्रमाणेच येथील संस्कृतीत मिसळून गेले.

याचप्रमाणे भारतीय मुसलमान बाहेरून आले हे म्हणणे पूर्णपणे असत्य व खोडसाळ आहे. बाहेरून आलेल्या तुर्क, अफगाण व मुघल याची संख्या शक, हूण, ग्रीकाप्रमाणेच शुद्र होती. आज भारतात कुणीही तुर्क, अफगाण व मुघल राहत नाही.

भारतीय मुसलमान बाहेरून आले हे म्हणणे भारतीय ख्रिस्ती इंग्लंडमधून भारतात आले असे म्हणण्याइतकेच सुबुध्द आहे.

इंग्रजांचे उदाहरण तर आपल्या डोळ्यासमोरच आहे. इंग्रजांनी

भारत जिंकण्यासाठी आपले सैन्य इंग्लंडहून आणले नव्हते. ते भारतातच उभारलेले होते. इंग्रज हे भारतात वसलेले लोक होते हे म्हणणे धडधडीत असत्य आहे.

सारांश, भारतीय समाज हा परकीयांच्या लोंढ्यांनी बनलेला आहे व त्यामुळे त्याच्यात राष्ट्रीयत्वाचे कोणतेही एक सूत्र शोधणे व्यर्थ आहे हे नेहरूवादाचे आद्यतत्त्व अर्वथैव असत्य आहे.

'आज भारतात राहणारे मुसलमान, तुर्क, अफगाण व मुघलांचे वंशज नसतील. पण त्यांनी त्यांची संस्कृती आपली मानली आहे व ते कोणालाही वेगळे ओळखू येतात. मग ते व हिंदू एकाच राष्ट्राचे घटक आहेत असे कसे म्हणायचे?' असे नेहरूवादाचे समर्थक विचारू शकतील.

हिंदू व मुसलमान हे एकाच राष्ट्राचे घटक नाहीत असे नेहरू स्वराज्य होण्यापूर्वी म्हणत नव्हते. तसे असते तर त्यांना पाकिस्तानला विरोध करताच आला नसता. 'भारत हे राष्ट्र नाही.' हा साक्षात्कार नेहरूंना माऊंटबॅटनच्या सहवासाने झाला.

'भारत हे राष्ट्रच नाही.' म्हटल्यावर साऱ्या भारतात सगळ्यांना समजणारी एखादी भाषा असण्याची जरूर नाही. या दुसऱ्या तत्त्वावर नेहरूंना सहजच उडी मारता आली. त्यामुळे त्यांनी 'हिंदी ही भारतीय संघराज्याची एकमात्र भाषा राहील.' या संविधानाच्या कलमाची अंमलबजावणी करण्यात शक्य तितके अडथळे आणले. तसेच भाषावार प्रांतरचना झाल्याने प्रांतीय भाषा सर्वत्र वापरल्या जातील व इंग्रजीला कोठेच स्थान उरणार नाही म्हणून त्यांनी भाषावार प्रांतरचनेला शक्य तितका विरोध केला.

'भारत हे राष्ट्र नाही.' ही भावना पेरण्यात नेहरुंना भरघोस सफलता मिळाली. आज ज्यांना स्वभाषा येतच नाही व स्वेतिहासाचे ज्ञानच नाही- मग त्याबद्दल काही भावनात्मक वृत्ती असण्याचे दूरच. अशा तीन पिढ्या गेल्या आहेत. मी एम्. कॉम. झालेल्या एका तरुण मराठी मुलीला 'धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यचि तानाजी' ही ओळ म्हणून दाखविली व तिचा अर्थ विचारला. तिला तो सांगता आला नाही. 'शिवाजी कोण होता?' असे विचारले तेव्हा 'मुसलमानाविरुध्द ज्याने अनेक विजय मिळविले असा महाराष्ट्राचा एक राजा.' अशी एखाद्या इंग्रजी कोशात वाचलेली माहिती सांगितली. या नावाबद्दल तिच्या मनात काही भावना असल्याचे दिसले नाही. 'मराठी पुस्तके व वर्तमानपत्रे वाचतेस का?' असे विचारले तेव्हा तिने स्पष्ट नाही असे सांगितले. 'हर हर महादेव' म्हणजे काय असे विचारले तेव्हा तिने 'हे एका हिंदू देवाचे नाव आहे.' असे सांगितले. 'हर हर महादेव' हे शब्द ऐकून आजच्या पिढीतील कोणत्याही मराठी तरुणाच्या अंगावर रोमांच उभे राहत असतील असे मला वाटत नाही.

यावर काही लोक म्हणतील 'हे सर्व इष्टच नाही का? 'हर हर महादेव' अशी गर्जना करून उत्स्फूर्त होणे म्हणजे याच देशातील मुसलमानांचा द्वेष करणे व त्याच्या कत्तली करण्यास सज्ज होणे.

**प्रगतीची कसोटी व रणांगण**

मराठीत व्यवहार करणे व मराठी वाङ्मयाचे मनावर संस्कार होऊ देणे म्हणजे एका संकुचित प्रदेशाच्या अभिमान धरून इतर भारतीयाचा द्वेष करणे. त्यापेक्षा सर्व व्यवहारात इंग्रजीच वापरले व आपल्या भाषा अजिबात विसरल्या तर विश्वबंधुत्वाच्या वृत्तीचे पोषण होईल. शिवाय आधुनिक ज्ञानविज्ञानात अधिक प्रगती होईल.

स्वराज्यानंतर नेहरुनी झोडलेल्या बहुतेक भाषणांचे हेच सार आहे. व याच विचारावर आधुनिक भारताची घडण झाली आहे. गेली पन्नास वर्षे हा विचार केवळ लेखन / भाषणात राहिलेला नाही. तेव्हा तो खरा आहे की नाही हे तपासून पाहणे आवश्यक आहे.

नेहरूवादाने ज्ञानविज्ञान व विकास यांची ग्वाही दिली होती. यात भारताची स्थिती काय आहे याचे आकडे उपलब्ध आहेत. World Summary म्हणून संयुक्त राष्ट्रांनी पुरविलेल्या माहितीवर आधारलेले आकडे वेळोवेळी प्रसिध्द होत असतात. तसेच Illustrated Books of World Ranking या प्रकाशनात ज्ञानविज्ञान व विकास या क्षेत्रात जगातील प्रमुख देशांचा काय क्रमांक लागतो हे सांगितले जाते. विकासाचा क्रमांक दरडोई उत्पन्न, सरासरी आयुर्मान व साक्षरतेचे प्रमाण यावरून ठरतो.

यात विज्ञानात भारताचा क्रमांक शंभराच्या खाली आहे. या शंभर देशांच्या यादीच्या बाहेर ज्या देशाचे नाव जगात मोठ्या प्रमाणावर माहित आहे असा एखादा तरी देश आहे की नाही याची शंका आहे.

स्वराज्याच्या काळात आपल्या देशात कोणताही जगन्मान्य शोध लागलेला नाही. उलट पाकिस्तानच्या भौतिकीविज्ञाला नोबेल प्राइज मिळालेले आहे. बंगला देशच्या अर्थचिदाला देखील नोबेल प्राइज मिळाले आहे. स्वराज्यानंतर कुणाही भारतनिवासी भारतीयाला विज्ञानाचे किंवा कोणतेच नोबेल प्राइज मिळालेले नाही.

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताची कामगिरी नेत्रदीपक आहे असा प्रचार केला जातो. पण वर सांगितलेल्या संदर्भ ग्रंथातच एका वर्षी ५५ देशांचे माहिती तंत्रज्ञानात ठरविलेले क्रमांक उद्धृत केलेले आहेत. त्यात भारताचा क्रमांक ५४ वा व पाकिस्तानचा ५५ वा आहे. म्हणजे या क्षेत्रात देखील पाकिस्तानच्या फार वरच्या श्रेणीत बसण्यासारखी भारताची कामगिरी नाही. विजय भटकरांनी कल्पिलेल्या परम संगणकाने अजून वापरात येणाऱ्या यंत्राचे रूप धारण केलेले नाही अशी बातमी तरुण भारत दैनिकात प्रसिध्द झाली होती. विजय भटकरांनी स्वतःच एका व्याख्यानात 'माझ्या संकल्पनेप्रमाणे संगणक बनविल्यास तो परम संगणकाचे काम करू शकतो हे जगातील वैज्ञानिकांना मी पटवून दिले.' असे सांगितले. याचाच अर्थ असा होतो की हा संगणक अजून वापरता येणाऱ्या यंत्राच्या स्वरूपात उपलब्ध नाही. तसा असता तर त्यावर काम करणाऱ्या कोणत्याही कारकूनाला तो संगणक काय करू शकतो याचे प्रात्यक्षिक करता आले असते. त्याच्या निर्मात्यालाच स्वतः ते पटवून देण्याची जरूर पडली नसती.

पाकिस्तान व बंगला देश यात इंग्रजी भाषेचे भारताइतके स्तोम माजविण्यात येत नाही हे या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे. बंगला

देशची तर स्थापनाच बंगाली भाषेच्या अभिमानावर झालेली आहे. बंगलादेशी पंतप्रधान भारतात आली होती तेव्हा ती बंगाली भाषेशिवाय दुसरी भाषा वापरताना दूरदर्शनवर दिसली नाही.

दरडोई उत्पन्न, सरासरी आयुर्मान व साक्षरतेचे शतमान या तीन मानांकांनी विकास मोजला जातो. १९९० पर्यंत पाकिस्तानचा क्रमांक भारताच्या वर राहिलेला आहे. श्रीलंकेचा तर स्वातंत्र्योत्तर काळात सदैव वरच आहे. बंगला देशमध्ये असलेल्या किंमती ध्यानात ठेवल्या तर भारतातील सामान्य नागरिक आपल्या उत्पन्नात ज्या स्तरावर राहू शकतो त्यापेक्षा बंगला देशातील नागरिक आपल्या उत्पन्नात अधिक चांगल्यारीतीने राहू शकतो.

ज्या विशेषांच्या बाबतीत क्रमांक लावले जातात, त्यात भ्रष्टता, महारोग, अंधत्व, वगैरेंचा देखील समावेश आहे. या सर्वांत भारताचा क्रमांक बराच वर आहे.

**गांधी, नेहरू व मुसलमान**

प्रगतीच्या मानदंडात संयुक्त राष्ट्रांनी लष्करी सामर्थ्याचा समावेश केलेला नाही. कारण ही संस्था जगात युध्दे होऊ नयेत या उद्देशाने काढलेली आहे.

लष्करी सामर्थ्याची कसोटी रणांगणावर निर्विवादपणे लागत असते. या कसोटीवर दिसणारे भारताचे चित्र भयावह आहे. गोवामुक्ती सोडली तर बाकी साऱ्या लढायात भारताचा पराभव झालेला आहे.

काही वाचक विचारतील, 'वरील वर्णनात भारताचे जे शोचनीय स्वरूप दिसते त्याचा व राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा काय संबंध आहे?' याचे उत्तर देणे हाच या लेखाचा मुख्य उद्देश आहे.

वर वर्णन केलेली भारताची स्थिती वाचून कुणाला दु:ख होईल? ज्याला भारत हा आपला देश वाटतो त्यालाच. इतर कोणी 'भारताची अवस्था सर्व क्षेत्रात दीन असेना! माझी स्थिती दीन नाही. मला भारताची अवस्था कशी आहे याच्याशी काय करायचे आहे?' अशीच वृत्ती ठेवील. तसेच भ्रष्टाचाराची खंत कुणाला वाटेल? आपल्या वागण्याने देशाचे नुकसान होऊ नये ही भावना ज्याच्या मनात वागत असेल त्यालाच ना? देशद्रोह्यांचा देशच भ्रष्ट राहू शकतो. देशभक्तांचा नाही.

माझे माझ्या राष्ट्रावर प्रेम असेल म्हणजे मी इतर राष्ट्रांचा द्वेष केला पाहिजे असे ठरत नाही. माझ्या आईवर प्रेम करण्यासाठी मी दुसऱ्याच्या आयांचा द्वेष केला पाहिजे असे नाही. उलट जो स्वत:च्या आईचा आदर राखतो तोच दुसऱ्यांच्या आईबद्दल आदर बाळगण्याचा जास्त संभव असतो.

'हर हर महादेव' या गर्जनेने ज्यांच्या अंगावर रोमांच उभे राहतात ते भारतीय मुसलमानांबद्दल आपलेपणा बाळगू शकणार नाहीत या आक्षेपाचे उत्तरही प्रत्यक्ष उदाहरणांनीच देण्यासारखे आहे. नानासाहेब पेशवे 'हर हर महादेव' या गर्जनेने उत्तेजित होणारेच होते. पण त्यांचे हजारो अनुयायी मुसलमान होते. अझीमुल्ला हा त्यांचा खास हस्तक होता व महमद अली या मुसलमान मुलाला आश्रय देऊन त्याला त्यांनी इंजीनियर बनविले होते. इंग्रज जिंकणार हे स्पष्ट झाल्याबरोबर अझीमुल्ला व महमद अली या दोघांनाही इंग्रजांच्या जाहीरनाम्याच्या आधारे शरणागती पत्करून इंग्रजांचा अनुग्रह संपादन करता आला असता. पण 'जगू तर नानासाहेबांबरोबरच व मरू तर नानासाहेबांबरोबरच.' हा बाणा त्यांनी सोडला नाही. महमद अलीने हौतात्म्य पत्करले व अझीमुल्ला नानासाहेबांबरोबरच अज्ञातवासी झाला.

नानासाहेबांचे अनुयायी हे त्यांचे नोकर होते व म्हणून त्यांची निष्ठा ही भाडोत्री सैनिकांची नीतिमत्ता होती असा आक्षेप घेता येणार नाही. पगार देऊन सैनिक बाळगण्याइतके नानासाहेब संपन्न नव्हते. बापाची पेन्शन त्याना नाकारण्यात आल्यावर त्यांच्याजवळ उत्पन्नाचे साधन फारसे असण्याचा संभव नाही. त्यांचे बहुतेक अनुयायी स्वयंसेवक होते.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या क्रांतिसैन्यात मराठा सैनिक होते व उरलेल्या सैनिकांत देखील हिंदूच बहुसंख्य होते. इंग्रजांच्या सैन्यातील कर्नल भोसले हे नेताजींचे एक प्रमुख सेनानी होते. या सैन्यात 'हर.हर महादेव' वा तत्सदृश हिंदू देवांच्या नावाने रणगर्जना होत असणारच. पण अशा गर्जना करणाऱ्या सैनिकांनी भारतीय मुसलमानांचा द्वेष केल्याचे काही प्रमाण आहे काय? नानासाहेब पेशव्याच्या सैनिकांप्रमाणेच नेताजींचे सैनिक स्वयंसेवक होते. त्यांची निष्ठा भाडोत्री सैनिकांच्या जातीची निष्ठा नव्हती.

या मुद्याचे सर्वांत परिचित उदाहरण म. गांधींचे आहे. म. गांधींचे हजारो निष्ठावंत अनुयायी मुसलमान होते. ते त्यांचा जयजयकार करीत लाठ्या व तुरुंगवास सोसत होते. सीमा प्रांतातील पठाण 'म.गांधीकी जय' म्हणत ब्रिटिशाविरुध्द संघर्ष करीत होते. म.गांधींचे पुढारीपण मानणाऱ्या सीमा प्रांतातील काँग्रेसने मुस्लिम लीगचा पराभव करून काँग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापले होते. पण मुसलमानांचा एवढा विश्वास संपादन करणारे गांधी 'आपण हिंदू आहोत.' हे सांगायला कचरत होते काय? मुळीच नाही. मुसलमान भेटायला आला तरी त्यांचे 'रघुपती राघव राजाराम' चालू असेल तर त्यांत खंड पडत नव्हता.

या उलट नेहरूंचे उदाहरण आहे. आपण हिंदू आहोत हे म्हणण्यात त्यांना लाज वाटत होती. ते 'मी पेगन आहे' असे म्हणत. पेगन हा शब्द गैरख्रिस्ती या अर्थी वापरतात असे असून स्वतः पं.नेहरू एखाद्या मुस्लिमबहुल मदारसंघातून निवडून आले असते अशी त्यांना देखील खात्री वाटत नव्हती. म्हणूनच ज्या मुस्लिम लीगविरुध्द ते स्वराज्यापूर्वी आग पाखडीत त्या मुस्लिम लीगच्या आश्रयानेच त्यांनी केरलचे राजकारण केले. शेख अब्दुल्ला व मौलाना आझाद या त्यांच्या राजकीय सहकाऱ्यांना त्यांच्याबद्दल आपुलकीची भावना नव्हती व हे त्यांनी जाहीरपणे व्यक्त केले आहे.

यासंबंधी हमीद दलवाईंचे विचार उद्धृत करण्यासारखे आहेत. ते म्हणाले होते, 'भारतावर स्वारी करणाऱ्या तुर्क / अफगाण व मुघलांचा द्वेष करण्याचा मला जितका अधिकार आहे तितका तो हिंदूंना नाही. कारण या आक्रमकांनी माझ्या पूर्वजावर अत्याचार केले म्हणून मी आज मुसलमान आहे. हिंदूंच्या पूर्वजांवर त्या मानाने कमी अत्याचार केले त्यामुळे ते हिंदू राहू शकले.'

भारतात एकराष्ट्रीयत्व पसरण्याच्या मार्गात हिंदूचा स्वधर्माबद्दलचा आदर ही आडकाठी नाही व स्वधर्मद्वेष साहाय्यभूत नाही हे वरील उदाहरणावरून स्पष्ट व्हावे.

अभ्रष्टतेप्रमाणेच विज्ञान असो की जीवनाचे इतर कोणतेही क्षेत्र असो त्यात उत्कृष्ट कामगिरी करण्यात देखील स्वाभिमान आवश्यक आहे. आपण केवळ दुसऱ्यांचीच पोपटपंची करतो. आपल्याजवळ आपले काही नाही अशी खंत ज्या वैज्ञानिकाला वाटत नाही तो विज्ञानात नव्या वाटा शोधू शकणार नाही. वेदप्रामाण्याने ज्याप्रमाणे जुन्या काळी भारतीय विज्ञान मारून टाकले त्याचप्रमाणे आज इंग्रजप्रामाण्य ही वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गातली मुख्य अडचण आहे. आपल्याला दर चार पाच वर्षांनी नवीन तंत्र वापरावे लागते व त्यांपैकी एकही भारतात उद्भवलेले नसते याची ज्या यांत्रिकांना वा शल्योपचारकांना खंत वाटत नाही ते जन्मभर नकलाच करीत राहणार. ते खरे खुरे वैज्ञानिक होऊच शकणार नाहीत.

इंग्रजीचे व इंग्रजी राज्याचे पोवाडे window on the world या शब्दांनी आजकाल गायिले जातात. यात एक मूलभूत गोष्ट विसरली जाते. खिडक्यासाठी भिंती आवश्यक असतात. भिंतीच नसतील तर खिडक्याच काय घरही बनू शकणार नाही. त्याचप्रमाणे ज्याला स्वतःची अक्कल आहे तोच दुसऱ्याच्या अकलेचा उपयोग करू शकतो. परभाषेचा फायदा करून घेण्यासाठी जे स्वभाषेचाच गळा घोटू इच्छितात व विदेशीय संबंधांचा फायदा मिळविण्यासाठी जे स्वराज्यावरच कुऱ्हाड चालवितात ते घरावाचून खिडक्या बनवू इच्छित असतात.